**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ८८६-२०२५**
**जुना क्रमांक ९२४-२०२३**
अशोक वि. वसंताबाई व इतर
CNR No. MHOS140010612025

# अर्ज निशाणी क्र. ५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल केला आहे. अर्जातील कथन की, मौजे शिराळा, ता. परंडा येथील गट क्रमांक १६६ मधील क्षेत्र २ हे. ६२ आर (जुना सर्वे क्रमांक १७१ब) या दाव्याचा विषय असून यापुढे सदर जमिनीस ''वाद जमीन'' असे संबोधण्यात येईल.

२. पुढे अर्जातील कथन की, वाद जमीन वादी व प्रतिवादी क्रमांक १ व ६ यांच्या वडीलोपार्जित एकत्र कुटूंबाची मिळकत असून या जमिनीचे मुळ मालक वादीचे आजोबा कृष्णा होते. कृष्णा यांच्या मृत्यूनंतर फेरफार क्रमांक ७४ अनुसार त्यांचे वारस वादीचे वडील भिमराव, विश्वनाथ, नरहरी, श्रीरंग, जिलाबाई व द्रोपदी यांच्या नावाची नोंद झाली. वर नमुद फेरफार क्रमांक ७४ अनुसार वाद जमिनीच्या सातबारा उताऱ्यात नोंदी होणे आवश्यक होते परंतु विश्वनाथ हा कृष्णाचा मोठा मुलगा असल्याकारणाने कुटूंबाचा कर्ता म्हणून फक्त त्याच्या नावाची नोंद झाली. वाद जमिनीवर कृष्णाचे सर्व वारसांचा सामाईक मालकी ताबा व वहिवाट होता व आहे.

३. पुढे अर्जातील कथन की, विश्वनाथ याच्या मृत्यूनंतर त्याची मुलगी प्रतिवादी क्रमांक १ वसंताबाई हिने फेरफार क्रमांक ११५९ अनुसार वारस म्हणून स्वतःच्या नावाची नोंद वादी व इतर प्रतिवादी यांच्या उपरोक्ष करुन घेतली आणि सदर फेरफारच्या आधारे वाद जमीन प्रतिवादी क्रमांक ३ व ७ यांच्या हक्कात खरेदीखताद्वारे हस्तांतरीत केली. सध्या वाद जमीन प्रतिवादी क्रमांक ३ व ७ यांच्या नावे आहे. वाद जमिनीत वादीचा वडीलोपार्जित अविभक्त हिस्सा होता व आहे. वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असताना प्रतिवादी क्रमांक ३ व ७ हे वाद जमिनीची विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास वादीची कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी दाव्याचा निकाल होईपावेतो

प्रतिवादी क्रमांक ३ व ७ यांनी वाद जमिनीची विक्री किंवा तिऱ्हाईत इसमाच्या नावे हस्तांतर करु नये असा तात्पुरता मनाई आदेश द्यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास त्यांचे लेखी म्हणणे दखल केले नाही.

५. उभय पक्षांचे लेखी कथन व त्यांचे विधीज्ञांचा युक्तीवादावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झालेले असून त्यांचे निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

## मुद्दे

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने प्रस्तत अर्ज संदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय? | होय |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय? | होय |
| ३. | अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे नुकसान होणार आहे काय? | होय. |
| ४. | कोणता आदेश? | अर्ज मंजुर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

६. वादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी तर्फे युक्तीवाद सादर करण्यात आला नाही.

## मुद्दे क्रमांक १ ते ४ करिता

७. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची चर्चा मी एकत्रीतरित्या करीत आहे. संचिकेचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वाद जमिनीचे सरस निरस

मानाने वाटप होऊन प्रतिवादींनी वाद जमिनीसंदर्भात केलेले दस्त वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही, असे जाहीर होऊन मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. अर्जातील कथनाच्या पुष्टयार्थ वादीने स्वतःचे शपथपत्र व यादी निशाणी क्रमांक ४ सोबत वाद जमिनी संदर्भात झालेले फेरफार उतारे, सातबारे उतारे व खरेदीदस्ताच्या प्रती दाखल केल्या आहेत. न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या फेरफार उताऱ्यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादीचे आजोबा कृष्णा यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांचय्ा नावे फेरफार क्रमांक ७४ मंजुर झाला. सदर फेरमध्ये वादीचे वडील भिमराव यांचा देखील वारस म्हणून नोंद आहे. पुढे असे दिसून येते की, फेरफार क्रमांक ७४ च्या अनुषंगाने कुटूंबातील कर्ता म्हणून मयत कृष्णा याचा मोठा मुलगा विश्वनाथ याच्या नावाची नोंद वाद जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर झाली. विश्वनाथच्या मृत्यूनंतर त्याची वारस म्हणून प्रतिवादी क्रमांक १ हिने वादी व इतर प्रतिवादी यांच्या उपरोक्ष फेरफार क्रमांक ११५९ मंजुर करुन घेतला आणि वाद जमीन प्रतिवादी क्रमांक ३ व ७ यांचया नावे हस्तांतर केली.

८. पुढे असे दिसून येते की, वाद जमीन प्रतिवादी क्रमांक ३ व ७ यांचया नावे आहे. वादीने शपथेवर असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रमांक ३ व ७ हे वाद जमिनीचे विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाल्यास निश्वतच वादीचे कधीही न भरुन नुकसान होणार आहे आणि दाव्यात गुंतागुंत निर्माण होणार आहे. प्रतिवादी यांच्या विरुद्ध तात्पुरता मनाई आदेश न दिल्यास ते भविष्यात वाद जमिनीची विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सबब, प्रस्ततचा अर्जा मंजुर होणेकामी वादीने प्रथम दर्शनी पुरावा सादर केला आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे दिसून येत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादींच्या मागण्यानुसार मंजुर होण्यास पात्र आहे. त्याअनुषंगाने मी मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी क्रमांक ५ **मंजुर** करण्यात आला.

२. प्रतिवादी क्रमांक ३ व ७ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी वाद जमिनीची कोणत्याही दस्ताद्वारे विल्हेवाट किंवा विक्री करु नये, असा तातपुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात येत आहे.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.01.23 17:06:01 +0530

दिनांकः–२२.०१.२०२६

**(अ. अ. शेख)**

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 22-01-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 22-01-2026 |
| Order uploaded on | - | 23-01-2026 |